# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 04/12/2015 ( का.प.क्र.10) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 4 डिसेंबर 2015 (का.प.क्र.10) रोजी मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.45 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.उपआयुक्त श्री.रविंद्र निकम, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
13. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे

श्री.विकास एडके :मा.आयुक्त श्री.केंद्रेकर साहेब यांनी पदभार घेतल्यापासून महापालिका प्रशासनातील आवश्यक त्या सुधारणा चांगल्याप्रकारे केल्या, त्याबध्दल त्याचें अभिनंदन करण्यात यावे.

श्री.नितीन चित्ते :शहरातील कचरा निर्मुलन, अतिक्रमण हटविणे हे विषय जोमाने हाती घेतले व कर्मचारी यांना शिस्त लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नागरीकांचे प्रश्न वार्डातील विकास कामाचा प्रश्न असेल सर्वाना वेळ देत आहे आमचा बोजा कमी केला त्यांचे आभार मानतो. अभिनंदनही करावे.

श्री.मकरंद कुलकर्णी :मा.श्री.केंद्रेकर साहेब यांनी सिडको भागात चांगले काम केले अनेक मालमत्ता गिळकृत होत होत्या त्या सिडकोला मिळवून दिल्या उत्पन्न वाढविले येथेही ते चांगले काम करीत आहे करतील अशी अपेक्षा आहे अभिनंदन करावे.

श्री.गजानन बारवाल : अभिनंदन करावेच परंतु आवश्यक विकास कामे करावी. नागरीकांचे प्रश्न तातडीने सोडवावे जे जे निर्णय सभागृह घेईल, त्याची अमंलबजावणी व्हावी. सर्वांना विश्वासात घेऊन काम करावे.अशी अपेक्षा आहे.

मा.सभापती :आताच स.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या निश्चित प्रशासनाच्या कामात सुधारणा होत असल्याचे दिसून येते. स.पदाधिकारी सदस्य यांचे सोबत समन्वय ठेवण्याचा त्यांचा चांगला प्रयत्न आहे. मा.आयुक्त यांचे अभिनंदन करण्यात येते. सर्व सदस्यांनीही त्यांना विकास कामे करण्यासाठी सहकार्य करावे.

**विषय क्र. 30 :** (विषय क्र.27 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि.05/11/2015 (का.प.क्र.09) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे.)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, अदालत रोडवरील आय.सी.सी.आय. बँक ते अशोका हॉटेल पर्यंतच्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या वाहनतळासाठी कार्यालयीन जा.क्र./मनपा/मामअ/2015/154, दि.08/07/2015 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता सदर वाहनतळाच्या एकूण-11 निविदा विक्री करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकूण 6 निविदा प्राप्त झालेले असून यापैकी अ.क्र.6 च्या निविदे सोबत अनामत रक्कमेचा डी.डी. नसल्याने निविदा उघडण्यात आलेली नाही व सदर पाच निविदा उपआयुक्त (मालमत्ता), मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष दि.04/08/2015 रोजी उघडण्यात आल्या त्याचे दर खालीलप्रमाणे.

**अदालत रोडवरील वाहनतळासाठी :**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | प्राप्त निविदा दर | अनामत रक्कमेचा डी.डी./ पावती क्र. |
|---|---|---|---|
| 01. | श्री.संतोष अनंतराव जगताप | 36,770/- | डी.डी. क्र.238976 रू.10,000/- Bank of Maharashtra |
| 02. | श्री.नितीन भागिनाथ घुसळे | 30,555/- | डी.डी. क्र.393160 रू.10,000/- The Karnataka Bank Limited |
| 03. | श्री.विनोद सुभाष बेदमुथा | 24,670/- | डी.डी. क्र.830747 रू.10,000/- HDFC Bank |
| 04. | श्री.विजय मुरलीधर डोळस | 18,350/- | डी.डी. क्र.372810 रू.10,000/- Dena Bank |
| 05. | श्री.गणेश राधाकिसन इंगळे | 6000/- | मनपा पा.क्र.14643 रू.10,000/- |
| 06. | मे.श्रध्दापुजा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था | Not To Open | अनामत रक्कमेचा डी.डी. नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही. |

उपरोक्त सदर वाहनतळा करीता एकूण सहा निविदा प्राप्त झालेल्या असून यापैकी पाच निविदेचा तुलनात्मक दराचा तक्ता पाहता सर्वात जास्त दराची निविदा रक्कम रू.36,770/- प्रतिमाह असून निविदा श्री.संतोष अनंतराव जगताप यांची आहे.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून करारनामा करून घेवुन कार्यादेश देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :या विषया संबधीत माहिती दयावी.

मालमत्ता अधिकारी :आयसीसीआय बँक ते अदालत रोड पर्यंतचे 5-6 वर्षापुर्वी पार्कीगचे टेंडर काढले होते. त्यानंतर वसुली झाली नाही आता नव्याने टेंडर काढले चांगला रिस्पॉन्स मिळाला आहे. रू.36770/- प्रतीमाह रक्कम मिळणार आहे.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अदालत रोडवरील आय.सी.सी.आय. बँक ते अशोका हॉटेल पर्यंतच्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या वाहनतळासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त म्हणजेच र.रू.36,770/- प्रतिमाह दराची श्री.संतोष अनंतराव जगताप यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 31 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, तत्कालीन मयत कर्मचारी श्री.राजु भगवान खेडकर, सफाई मजुर वॉर्ड फ हे A Large acute intracerebral haematoma involving the right parietal lobe and the thalamocapsular region with intraventricular extension (मेंदु विकार) या आकस्मित आजाराने आजारी होते (जे की शासन निर्णय व मनपा वैद्यकीय विनियम अन्वये 27 आकस्मित आजारामध्ये येत असल्याने वैद्यकीय देयक परतावा देय आहे)

त्यांनी गजानन क्रिटीकल हॉस्पीटल येथे उपचार घेतला असून, महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल नियम 1961) अन्वये महानगरपालिका वैद्यकीय देयक परतावा विनियोग तसेच महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग वैखप्र/2011/प्रक्र 333/11/ राकंवि 2/ मंत्रालय, मुंबई 32 दि.16/11/2011 व महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग निर्णय एन.ए.जी. 2005/प्रक्रं.1/आरोग्य 3 दि.19/03/2005 नुसार मा.स्थायी समिती सभा ठराव क्रं.168 दिनांक 13/10/2007 अन्वये संबंधीतास वैद्यकीय देयक परतावा देय आहे. सदर देयक अदा करण्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.21/07/2015 रोजी मान्यता दिलेली आहे. संबंधीतास देय असलेले वैद्यकीय परतावा रक्कम रू.285206/- मधुन 5 टक्के रक्कम रूपये 17872/- मनपा फंडात जमा करून घेणे व निव्वळ देयक रक्कम रू.267334/- इतका येतो व वैद्यकीय देय रक्कमेतून अग्रीम रक्कम रू.1,00,000/- वजा जाता रक्कम रू.167334/- (एक लाख सदुसष्ट हजार तीनशे चौतीस) (As per Court Succession Certificate) च्या आधारे संबंधीताच्या वारसास अदा करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

विषय क्रमांक 31 : विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तत्कालीन मयत कर्मचारी श्री.राजु भगवान खेडकर, सफाई मजुर वॉर्ड फ हे A Large acute intracerebral haematoma involving the right parietal lobe and the thalamocapsular region with intraventricular extension (मेंदु विकार) या आकस्मित आजाराने आजारी होते (जे की शासन निर्णय व मनपा वैद्यकीय विनियम अन्वये 27 आकस्मित आजारामध्ये येत असल्याने वैद्यकीय देयक परतावा देय आहे) त्यांनी गजानन क्रिटीकल हॉस्पीटल येथे घेतलेल्या उपचारानुसार संबंधीतास देय असलेले वैद्यकीय परतावा रक्कम रू.285206/- मधुन 5 टक्के रक्कम रूपये 17872/- मनपा फंडात जमा करून घेणे व निव्वळ देयक रक्कम रू.267334/- इतका येतो व वैद्यकीय देय रक्कमेतून अग्रीम रक्कम रू.1,00,000/- वजा जाता रक्कम रू.167334/- (एक लाख सदुसष्ट हजार तीनशे चौतीस) (As per Court Succession Certificate) च्या आधारे संबंधीताच्या वारसास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 32 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड-फ महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या आजारपणावर शासन मान्य असलेल्या ऐशियन इन्स्टीट्युट ऑफ गॅस्टोएंट्रोलॉजी रूग्णालय, हैद्राबाद व सिग्मा रूग्णालय, रघुवीरनगर, औरंगाबाद येथे उपचार केले असून त्या उपचारावर खर्च करण्यात आलेल्या वैद्यकीय परताव्याची मागणी केली आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना तीव्र उदर वेदना व पोटाचे तीव्र आजाराच्या उपचारार्थ एकुण केलेला खर्च रक्कम रू.6,59,734/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.1,06,783/- वजा जाता रू.5,52,951/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90% रू.4,97,656/- इतकी होते. एकुण खर्चाच्या 5% रक्कम रू.32,987/- ही मनपा फंडात जमा करता निव्वळ देय रक्कम रू.4,64,669/- अनुज्ञेय रक्कम असून यापूर्वी अदा करण्यात आलेली रक्कम रू.1,00,000/- वजा जाता रू.3,64,669/- (तीन लक्ष चौसष्ट हजार सहाशे एकोणसत्तर रूपये फक्त) संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार ऐशियन इन्स्टीट्युट ऑफ गॅस्टोएंट्रोलॉजी रूग्णालय, हैद्राबाद व सिग्मा रूग्णालय, रघुवीरनगर, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/ राकावि-2/मंत्रालय, मुंबई 32 दिनांक 16/11/2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रूग्णालयाचे नांव समाविष्ट आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

संबंधीतास तीव्र उदर वेदना व पोटाचे तीव्र आजार हे गंभीर स्वरूपाचे आजार असून त्यांना निव्वळ देय असलेली रक्कम रू.3,64,669/- अदा करण्यास मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

करीता रक्कम रू.3,64,669/- वैद्यकीय प्रतिपुर्ती रक्कम श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड फ महानगरपालिका औरंगाबाद यांना अदा करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

विषय क्रमांक 32 : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुधाकर ओंकार पवार, शाखा अभियंता, वॉर्ड फ महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या आजारपणावर शासन मान्य असलेल्या ऐशियन इन्स्टीट्युट ऑफ गॅस्टोएंट्रोलॉजी रूग्णालय, हैद्राबाद व सिग्मा रूग्णालय, रघुवीरनगर, औरंगाबाद येथे केलेल्या उपचारावर एकुण र.रू.6,59,734/- खर्च केलेला असल्यामुळे, त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.1,06,783/- वजा जाता रू.5,52,951/- शिल्लक या शिल्लक रक्कमेच्या 90% रू.4,97,656/- व एकुण खर्चाच्या 5% रक्कम रू.32,987/- ही मनपा फंडात जमा करता निव्वळ देय रक्कम रू.4,64,669/- अनुज्ञेय रक्कम असून यापूर्वी अदा करण्यात आलेली रक्कम रू.1,00,000/- वजा जाता रू.3,64,669/- (तीन लक्ष चौसष्ट हजार सहाशे एकोणसत्तर रूपये फक्त) संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.गजानन बारवाल : सुवर्ण जयंती रोजगार योजनेचा विषय प्रलंबीत आहे.ज्याचे प्रकरण बँकेमध्ये मंजूर आहे,चेक काढणे प्रलंबीत आहे. शासन जी.आर.प्रमाणे थांबविता येत नाही. ते देण्यात यावे.

श्री.विकास एडके :यास स्थगिती दिली होती आता शासन जीआर आला, शासनानेही मान्यता दिली.

उपआयुक्त (प्र) :नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी सुचना देण्यात येतील.

मा.सभापती :मागे यास स्थगिती दिली होती नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री.नितीन चित्ते :सहा.प्रकल्प अधिकारी रूजू करून घेतले.परंतु 11-11-14 ठराव 661 नुसार यानंतर शासनाने सहा.प्रकल्प अधिकारी पाठवू नये.असा ठराव घेतला मा.जिल्हीधिकारी यांनाही कळविले होते.आस्थापना अधिकारी यांनीही संबधीत विभागास पत्र पाठविले.असे असतांना 5-11-2015 रोजी सहा.प्रकल्प अधिकारी रूजू करून घेतले का माहिती दयावी.

श्री.गजानन बारवाल :केंव्हापासून रूजू झाले, नाव सांगावे व मनपाचे अधिकारी नको का खुलासा करावा. सर्वसाधारण सभेने त्यास स्थगीती दिली होती. मा.आयुक्त यांनी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पत्रव्यवहारही केला होता. असे असतांना शासनाकडील अधिकारी का आले.

उपआयुक्त प्र. :संबधीत अधिकारी रूजू झालेले आहे.काम ही करीत आहे.

मा.सभापती : ठराव क्र.661 नुसार या पदावर बाहेरील अधिकारी नको ठराव घेतला तरी ही बाहेरील अधिकारी रूजू करून घेतले. रूजू करून घेण्याची गरज नव्हती. परत पाठविण्याची कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :समांतर विषयी आपण अनेकदा बैठका घेतो अजूनही नागरीकाच्या समस्या व संभ्रम दूर झाले नाही, नळ रेग्युलाईज डिसेंबर अखेर करण्यासाठी रू.4750/-घेणार असे पेपरला दिले अधिकृत केले नाही तर रू.5 हजार दंड लावणार असे करण्यास महापालिकेची मंजूरी घेतली का. 2-2 महिण्याची वसुली समांतर एजन्सी करीत

आहे त्यासही मंजूरी घेतली का? सहा महिण्यानंतर पुढील सहा महिण्याचा ही दंड कोणत्या नियमानुसार लावतो.

शहर अभियंता :महापालिकेची वसुली होईल व नागरीकांचेही नळ नियमीत होतील या हेतूने नळ कनेक्शन नियमीत करण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला सर्वसाधारण सभेनेही पांठीबा दिला आहे. दोन दिवसात काय झाले माहित नाही.अनधिकृत नळ असेल तर दंड लावला पाहिजे. दंडाची रक्कम आकारणे व ते नळ कनेक्शन रेग्युलाईज करणे बाबत माहिती घेतली जाईल.

मा.सभापती :शहर अभियंता यांनी माहिती घेऊन स सदस्य यांना माहिती दयावी.

श्री.रावसाहेब आमले :समांतर व भुमिगत गटार योंजनेचे अनेक कामे चालू आहे वार्ड 14,15 मध्ये एकही काम चालू नाही.

कार्य.अभियंता(ड्रे.) :या भागात एसटीपीची जागा निश्चित केली त्याचे बेसिक इंजिनिअरींग पॅकेज तयार झाले.लवकरच कामे हाती घेतले जाईल मेन सिव्हरचे काम नाल्यामध्ये सुरू आहे.

श्री.रावसाहेब आमले : एन ए 44 प्लॉट असलेल्या भागात लाईनचे काम होत नाही ड्रेनेजचे पाणी बाहेर येते वार्ड 15 मिटमिटा येथील पाणी पडेगाव येथे आणण्यासाठी नकाशा वगैरे केले. डिप जास्त येते.म्हणून काम थांबविले. लहान कॉलनीमधून आऊटलेट लाईन नाही नाल्यात घाण पाणी मोकळे सोडले आहे.

कार्य.अभियंता- ड्रेनेज :काम सुरू करणार आहे. प्लॅनींग झाली आहे.

मा.सभापती :मुख्य मल वाहिनी टाकण्यासाठी निर्णय घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :माझ्या वार्डात अर्धवट काम राहिले ते पुर्ण करावे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :तेथे पाहणी करून निर्णय घेतला जाईल.

श्री.रावसाहेब आमले :समांतर एजन्सीने माझ्या वार्डात कुठेही लाईन टाकली नाही एन ए 44 भाग आहे बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केले आहे काम होत नाही.

मा.सभापती :या भागात कामे करण्यात यावी.

श्रीमती समीना शेख :दि.30-9-2015 पत्र देऊन वार्ड अ व ड भागात जलनिसारण वाहिनीची सन 2013-15 या काळात केलेल्या कामाची माहिती मागितली दिली नाही.

मा.सभापती :संबधीत अधिकारी नाही शहर अभियंता यांनी माहिती घेऊन 15 दिवसात स.सदस्यांना माहिती दयावी.

श्री.नितीन चित्ते :स्थायी समितीच्या सभेत जे प्रश्न उपस्थित केले ते सोडविले नाही.टीडीआर विषयी प्रश्न केला होता तेथील मिळकत धारक कोण कुणाला टीडीआर दिला नकाशा दिला तोडी सांगितले चौकशी लावली असे सांगितले गेले टीडीआरचा अहवाल दिला असे समजते.माहिती दयावी.

उपअभियंता(श्री.देशमुख):या प्रकराणाची चौकशी अति.आयुक्त हे करीत आहे.इतर टीडीआर संदर्भात माहिती प्रशासनाकडे सादर करण्यात येईल.

श्री.नितीन चित्ते :दि.06/07/15 ला पत्र देऊन मंजूर टीडीआर संचिकाची प्रत मिळावी मागणी केली, दिले नाही दि.08/07/2015 पुन्हा पत्र दिले व कायदेशीर कार्यवाही काय करणार विचारणा केली दिनांक 11/09/15 ला डॉ.नितीनजी करीर मा.प्रधानसचिव नगरविकास विभाग यांना पत्र दिले मा.आयुक्ता व नगररचना विभागास प्रत दिली सिरीयस घेतले नाही.संबधीत जागेवर बँकेचे कर्ज असतांना टीडीआर देऊ शकतो का?

उपअभियंता(श्री.देशमुख):जे मुद्दे उपस्थित केले त्यानुसार मा.आयुक्तांनी चौकशीचे निर्देश दिले अहवाल आल्यानंतर सर्व समोर येईल.

| | |
|---|---|
| श्री.नितीन चित्ते | :त्या जागेवर बँकेचे 1.30 ोटी कर्ज होते बँकेने तसे कळविले तरीही टीडीआर दिला. सामान्य व्यक्ती थुंकल्यास त्यास 500 दंड करतात. टीडीआरमध्ये मोठी चुक झाली असतांना पाठीशी घालणे योग्य नाही. 7 महिण्यापासून पाठपुरावा करतो उत्तर मिळत नाही.मी जे बोलतो ते सत्य प्रकार घडलेला आहे. |
| मा.सभापती | :स.सदस्यांना माहिती वेळेच्या आत दिली जावी. 7 व्या महिण्यात पत्र दिले अदयाप उत्तर दिले नाही. |
| श्री.विकास एडके | : दि.20-7-15 च्या सर्वसाधारण सभेत मी प्रश्न दिला की पीया मार्केट येथे इलिगल दोन बीअर शॉपी चालतात.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 81 (ब) नुसार जर ज्या अटी व शर्तीनुसार वापर करण्याची परवानगी दिली असेल व त्या अटीचे उल्लघन होत असेल तर कार्यवाही करू शकतो असे दिले आहे पाच महिण्यात कार्यवाही का केली नाही. |
| मालमत्ता अधिकारी | :पिया मार्केट येथे दोन शॉप दिले आहे.करारनाम्यानुसार तेथे मद्य विक्री करता येणार नाही असे आहे परंतु नगररचना विभागाने त्यांना ना हरकत प्रमाणपत्र दिले लिगली तपासणीसाठी संचिका पाठविली आहे.संचिका आल्यानंतर लगेच कार्यवाही होईल. |
| मा.सभापती | :त्वरीत माहिती घेऊन कार्यवाही करावी.व स.सदस्य यांनाही माहिती दयावी. |
| श्रीमती समीना शेख | : मनपाच्या आस्थापनेवर एकूण 205 कर्मचारी दै.वेतनावर 15-20 वर्षापासून कार्यरत आहे त्यांना दर 6 महिण्यानी दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्यात येते.मुदत संपल्यानंतर लगेच मुदतवाढ दिली जात नाही कामाचे अहवाल मागविण्यात येतात.त्यानंतर प्रस्ताव येतो यास 2-3 महिण्याचा कालावधी जातो.जे की उशीरा पगार मिळतो 7-8 हजार पगार मासिक मिळतो तसेच शासनाचे भत्ते व सुट्टीचा मोबदला मिळत नाही इमाने इतबारे काम करतात.या सर्व गोष्टीला उशीर का होतो खुलासा करावा. |
| उपआयुक्त(मालमत्ता) | :वर्ग-3,4 मध्ये दैनिक वेतनावर कर्मचारी कार्यरत आहे सहा महिण्यानंतर मुदतवाढ घेतो त्यांचे कामाचे अहवाल त्या त्या विभागाकडून मागविले जाते.मुदतवाढ देण्यास उशीर होणार नाही याची दखल घेतली जाईल. |
| मा.सभापती | :मुदत संपल्यानंतर लगेच पुढील एक महिण्याच्या आत मुदतवाढीचे आदेश मिळावे अशी कार्यवाही करावी. |
| श्री.रावसाहेब आमले | :या कर्मचाऱ्यांचे पीएफ कपात होते का? |
| मा.सभापती | :स.सदस्यांना लेखी माहिती दयावी. |
| श्री.नितीन चित्ते | :दुकानदारांनी रस्त्यावर कचरा टाकल्यास दंड लावतो तसाच हॉटेल मालकावर दंड आकारतो का? |
| उपआयुक्त(प्र) | :हॉटेल मालकांनी वेळेच्या व्यतिरिक्त कचरा कुंडीत घाण टाकल्यास दंडात्मक कार्यवाही करतो. |
| श्री.नितीन चित्ते | :हॉटेल मालक नाल्यात कचरा आणून टाकतांना दिसतात. मोठया हॉस्पीटलमधील कचरा उचलण्यासाठी एजन्सी काम करते परंतु जनरल लहान क्लिनीकचा कचरा कुठे जाते. माझ्या माहिती प्रमाणे डंपींग पॉइन्टवर ही घाण जाते त्यामूळे अनेक आजार फैलावत आहे. |
| आरोग्य वैद्य.अधिकारी | :कालच मा.आयुक्ता बरोबर बैठक झाली लहान क्लिनीक मधील घाण इतर कचरामध्ये मिसळत असतात सत्य परीस्थिती आहे.आता मनपाचे जे आरोग्य केंद्र आहे त्या त्या वैद्यकीय अधिका-यावर त्यांचे अंतर्गत येणा-या भागातील कचरा कुठे ही टाकला जाणार नाही जबाबदारी सोपविली. |

| | |
|---|---|
| श्री.नितीन चित्ते | :ऑपरेशन वगैरे केल्यानंतर तोडलेला शहराचा अवयव कुठे टाकला जातो. |
| आरोग्य वैद्य.अधिकारी | :बायोमेडीकल वेस्टमध्ये वेगळया पिशवीमध्ये टाकून बंधीस्त गाडयामध्ये वाहतूक करून साईटवर टाकणे आवश्यक आहे. |
| श्री.गजानन बारवाल | :माझ्या वार्डात हेल्थ सेन्टर तेथील पाण्याच्या टाक्या साफ केल्या जात नाही.एक गाडी घाण अयेल सर्व हॉस्पीटलच्या टाक्या साफ कराव्यात. |
| मा.सभापती | :या परीसराची व पाण्याच्या टाक्या साफ कराव्यात. बायोमेडीकल वेस्टच्या संदर्भात माझ्यासह मा.महापौर, आरोग्य वैद्य.अधिकारी यांनी व्हिजीट केली होती कालच आयएमए असोसिएशनच्या बरोबर बैठक झाली. सध्या जी एजन्सी आहे कचऱ्याची विल्हेवाट लावत नाही. |
| श्री.मोहन मेघावाले | :ताज हॉटेल ते सिध्दार्थनगर चौक ते सलीम अली सरोवर पर्यत नाला वाहतो ताज हॉटेल रस्त्याला लागून अंडा आम्लेट गाडया उभ्या असतात नाल्यात ते घाण टाकतात नाला अनेक ठिकाणी बंद केला आहे. |
| मा.सभापती | :संबधीत अधिकारी यांनी पाहणी करून तातडीने कार्यवाही करावी. |
| श्री.नितीन चित्ते | :कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कचरा मनपा की बाजार समिती उचलते. |
| उपआयुक्त (प्र) | :माहिती घेऊन सांगण्यात येईल. |
| श्री.रावसाहेब आमले | :रावरसपुरा ग्रामपंचायत आहे तेथे व माझ्या वार्डात जवळपास 100 हॉटेल येथील रॉ मटेरीयल नाल्यात आणून टाकले जाते.याचा बदोबस्त करावा.रोडवरील हॉटेल जेथे मटन विक्रेते आहे ते त्वरीत बंद करावे.मटन डिस्पोजल करू शकतो. |
| मुख्य पशुसंवर्धन अधि. | :नोटीस देऊन पोलीस स्टेशन मार्फत कार्यवाही केली जाईल. |
| श्री.नितीन चित्ते | :या प्रकारामुळे कुत्रे जमा होतात ते चावतात. |
| पशुसंवर्धन अधिकारी | :कुत्रे चावण्याचे तीन प्रकार माजाचा काळ त्यावेळी तसेच कुत्री व्यायली नंतर पिल्लाचे संरक्षणासाठी व त्या भागात रात्रीच्या वेळी नवीन कुणी व्यक्ती गेल्यास कुत्रे चावतात. |
| श्री.रावसाहेब आमले | :मुंबई हायवेवर 15-20 लोकांचा कुत्रेमूळे अपघात झाले सरार्स अवैध मटन विक्रेते बसतात. कार्यवाही करीत नाही. |
| पशुसंवर्धन अधिकारी | :चव्हाण कर्मचारी आहे ते काम करण्यास निष्क्रीय आहे त्याची बदली करण्याचे सूचना केल्या बदली अदयाप केली नाही. कुत्रे पकडण्यासाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे |
| मा.सभापती | :अवैध मटन विक्रेते, त्यांचेवर कार्यवाही करावी जे वेस्टेज पडते त्यामूळे कुत्र्यांची संख्या वाढते कुत्रे पडकण्याचा बदोबस्त करावा |
| उपआयुक्त(आस्थापना) | :आस्थापनेवर कर्मचारी नाही.खाजगी ठेकेदारामार्फत 6 कर्मचारी दिले जावे असे ठरले. ते उपलब्ध करून घ्यावे. |
| मा.सभापती | :रात्रीचे वेगळे पथक नेमावे आठ दिवसात कार्यवाही करावी. |
| श्री.कमलाकर जगताप | :जालना रोडवर मटन विक्रेते बसतात त्या दुकाना का हटविल्या जात नाही. 50 दुकाना असतील. घाण नाल्यात आणून टाकतात. |
| मा.सभापती | :सबंधीत कर्मचारी यांचेवर कार्यवाही करावी. एस.आय. कर्मचारी देण्यात यावे. |
| श्री.मोहन मेघावाले | :मटन विक्रीस ज्या दिवशी बंद दिवस असेल त्या दिवशी ते मार्केट बंदच असायला पाहिजे.टी व्ही सेन्टरला मार्केट आहे एकादशी असतांना अवैध मटन विक्री करतात.ते होऊ नये.पाच लायसन्स तर 50 बकरे कापतात. |
| मा.सभापती | :याची दखल घ्यावी बंदच्या दिवशी मटन मार्केट दुकान बंदच असावी. |

श्री.गजानन बारवाल :मटन मार्केटसाठी जागा उपलब्ध करून दयावी.

श्री.रावसाहेब आमले :2 बकरे कापणार 5-10रू पावती घेतात परंतु प्रत्यक्षात 25 बकरे कापतात त्यामूळे मोठी घाण वेस्टेज साचते.याकडे लक्ष दयावे.

पशुसवर्धन अधिकारी :अवैध कत्तल करणा-यावर 15-20 वर्षापासून एक पथक आहे त्यात एक कर्मचारी एक एसआय दोन सुरक्षा रक्षक आहे.परंतु आता व्याप्ती वाढली लायसन्स वाढले गुन्हयाची संख्या वाढली विक्री वाढली दोन वार्डसाठी एक पथक प्रस्तावित केले तीन पथक पाहिजे.जवळील पोलीस स्टेशनचा बदोबस्त घेऊन तेथल्या तेथेच कार्यवाही होणे आवश्यक आहे.दोन पथक आणखी पाहिजे. 85 गुन्हे दाखल केलेले आहे.

श्री.नितीन चित्ते :कर्मचारी नाही असे नेहमीच सांगितले जाते.2021 पर्यंत शहर अभियंता सह अनेक अधिकारी कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहे.असे असतांना भरती प्रक्रिया का करीत नाही आकृतीबंद तयार करावा कर्मचारी भरती करावे. आस्थापना विभाग काळजीने काम करीत नाही. 54 (1) नुसार कर्मचारी भरती केले, त्यांना कायम केले जात नाही.

उपआयुक्त(मालमत्ता) :पथकासाठी कर्मचारी देऊन प्रश्न सुटणार नाही.एकाच पथकाने एकाच भागात सतत पुर्णवेळ कार्यवाही करावी जेणे करून मटन विक्रेत्यामध्ये भिती निर्माण होईल. पुढील 25 वर्षापर्यंत लोकसंख्येच्या अधारे महापालिकेला काम करण्यासाठी किती कर्मचारी आवश्यक आहे यानुसार आढावा घे्उन पॅटर्न तयार करून शासनाकडे पाठविले अंतिम मान्यतेसाठी आहे.जे प्रश्न आताच उपस्थित केले त्यात लक्ष घालून निकाली काढले जातील.

मा.सभापती :त्वरीत कर्मचारी भरती प्रक्रिया सुरू करावी.आताच प्रश्न केल्यानुसार पशुसंवर्धन अधिकारी यांनी त्यांचेकडील एक पथकाकडेच काम करण्याचे ठरवून दयावे.एका भागात सतत पुर्ण कार्यवाही करावी.त्यानंतर दुसरा भागात अशा प्रकारे कार्यवाही करावी त्याचा अहवाल सभेसमोर दयावा.

पशुसवर्धन अधिकारी :श्री.चव्हाण यांची बदली करावी त्यांना नोटीसा देऊनही काम करीत नाही.

मा.सभापती :कामाचे शेडयूल त्यांना ठरवून दयावे काम न केल्यास अहवाल सादर करावा कार्यवाही करावी.

श्री.विकास एडके : शहरात अधिकृत, अनाधिकृत होर्डीग्ज किती मागील बैठकीत प्रश्न केलेला होता, त्यावर काहीच माहिती मिळाली नाही.

उपआयुक्त (मालमत्ता) : मागील बैठकीत हा विषय चर्चेला आला, वसुली संदर्भातही चर्चा झाली एकूण थकबाकी 44.51 लक्ष होती. त्यापैकी 20 दिवसात 12 लक्ष वसुल केले. आता 32 लक्ष वसुलीसाठी नोटीसा दिलेल्या आहेत. अधिकृत व अनाधिकृत होर्डीग्ज किती याचा पुर्ण सर्वे केला. फोटोग्राफ घेतले व्हिडीओ शुटींग केले. साईजसह सर्व माहिती घेतली. आज रोजी शहरात 518 होर्डींग आहे. यामध्ये 45 सातारा परिसरातील आहे. 348 होर्डीग्ज या रेकॉर्डनुसार अधिकृत आहे. पुर्ण रोडवाईज सर्वे केलेला आहे.

श्री.विकास एडके : जी माहिती समोर आली चुकीची वाटते. चिकलठाणा ते पडेगाव पर्यंतच्या रस्त्यावरच 500 पेक्षा जास्त होर्डीग्ज असतील.

मा.सभापती : मागील सभेमध्ये शहरातील अधिकृत व अनाधिकृत होर्डीगच्या संदर्भात सविस्तर चर्चा झाली होती. मनपा प्रशासनाने शहरातील अनधिकृत होर्डीगचा सर्वे केला या सर्वेमध्ये शहरात विविध ठिकाणी अनधिकृत होर्डीगची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून आले. त्यामुळे महापालिकेचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडत आहे. शहरात जे अनधिकृत होर्डीग लागलेले आहे त्या होर्डीग धारकांसाठी अभय

योजना जाहीर करण्यांत येत आहे. या योजनेचा लाभ सर्व अनधिकृत होर्डीग धारकांनी घ्यावा, यासाठी 30 दिवसाचा कालावधी देण्यांत येत आहे. एप्रिल 2015 पासून त्यांचेकडून अभय योजने अंतर्गत पैसे भरून घेण्यांत यावे. जे होर्डीग धारक या योजनेचा लाभ घेणार नाही, त्यांचेवर 30 दिवसानंतर तात्काळ गुन्हे दाखल करावे. संबंधीत होर्डीग धारकांकडून रू.10,000/- डिपॉझीट घेण्यात यावे याशिवाय मनपाचे उत्पन्न वाढविणेसाठी इतर बाबींचा विचार करून त्याबाबत प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी, असे आदेशित करण्यांत येत आहे.

श्री.नितीन चित्ते :स्मार्ट सिटीसाठी पीएमसी नेमली स्मार्ट सिटी कशी असावी नागरीकाची मते जाणून घेणेची जबाबदारी पीएमसीची की महापालिकेची आहे.यात सेवाभावी संस्थेची नियुक्ती केली ती पीएमसीने की महापालिकेने केली सेवा भावी संस्था नियुक्त केली टेंडर केले का? केले नसेल तर योग्य आहे का? ठराविक वेळात उद्दिष्ट साध्य करायचे होते ते झाले का? जर उद्दिष्ट साध्य केली नसेल तर काय ॲक्शन घेतली पीएमसी नेमल्यानंतर पुन्हा सेवाभावी संस्था नेमायची गरज आहे का?

कार्य.अभियंता(इ् व फ) :पीएमसीचे काम डीपीआर तयार करणे टेंडर नुसार व आवश्यक जी कामे आहे ते कामे करीत आहेत.दुसरी एजन्सी ही डोअर टू डोअर सर्वे करील निमयाप्रमाणे ई टेंडर झाले 4 टेंडर आलेले आहे कमी कॉल जे 5 रूपया प्रमाणे आले आहे. 1 लक्ष ओपीनीयन घेण्यात आले.

श्री् नितीन चित्ते :पीएमसीला हे काम का दिले नाही.आता सेवाभावी संस्था काम करणार ते महापालिकेला माहिती देणार त्यावर कोणाचे नियत्रंण असणार आहे.

कार्य.अभियंता(इ व फ) :एजन्सी सर्व माहिती जमा करणार त्याचे स्कॅन करून माहिती ठेवणार व एक प्रत पीएमसीला देणार आहोत.

श्री.नितीन चित्ते :पीएमसी वार्डात जाते.माहिती घेते तर दुस-या सेवा भावी संस्थेला हे काम देण्याची गरज का पडली.पीएमसी काय काम करणार आहे.

कार्य.अभियंता(इ व फ):पहिल्यांदा स्मार्ट सिटी करीत आहोत.नवीन कामे यात आहे पीएमसी मार्फत काय केले.सर्व माहिती आहे.6 झोन मध्ये प्रत्येक झोनमधील संबधीत सदस्य समवेत दोन वेळेस बै्ठका घेतल्या तसेच प्रशिक्षण संस्था आहे.आपला सर्वांचा सहभाग आवश्यक आहे.

श्री.नितीन चित्ते :वार्ड ब मध्ये प्रेझेन्टेशन होते ऐनवेळी सांगण्यात आले.सर्व सामान्य लोकांना याची माहिती दिली जात नाही. स्मार्ट सिटी कशी करणार 1.30 लक्ष फार्म देणार हे कशाच्या अधारे उद्दिष्ट ठेवले.

कार्य.अभियंता ई व फ :74 कि.मी.क्षेत्र आहे.शहराच्या मध्य व बाजूच्या भागात जाऊन डोअर टू डोअर जाऊन नागरीकाची मते घेतले झोन वाईज बैठक ठेवल्या सर्वच ठिकाणी प्रतिसाद मिळाला नाही बन्सीलाल येथे 70 टक्के प्रतिसाद मिळाला.

श्री.गजानन बारवाल :ज्योतीनगर येथील जलतरण तलाव बंद आहे केंव्हा सुरू करणार आहे.

कार्य.अभियंता(बीओटी) :कमेटी केली तेथील पाणी काढावे लागणार आहे.

उपआयुक्त (मा.म) :हा तलाव पुन्हा सुरू करण्या संदर्भात कमेटी त्यात शहर अभियंता कार्य.अभियंता श्री.सिकदंर अली मी स्वत: मालमत्ता अधिकारी अशी आहे.पाणी काढण्याचे ठरले 6 लक्ष लिटर पाणी आहे.ते पाणी फिल्टर करून उपयोगात येईल्‍ यात काही लाईफ मेंबर त्यांनी पैसे भरलेले होते.पुन्हा त्यांना तलाव सुरू केल्यास कन्टीन्यूव करणार बिल्डींग व स्ट्रक्चर उभे केले त्या बदल्यात लाईफ मेंबरकडून पैसे घेतले.ते त्यात

मर्ज करायचे त्यांचे जे साहित्य आहे त्यांना समक्ष बोलवून घेऊन जाण्यास परवानगी दयायची इथपर्यंत कार्यवाही केली.तेथे लाईट नाही संबधीत एजन्सीचे फिल्टर आहे त्यांचे परवानगीने चालू करावे लागेल.सम्मती देणार नाही तोपर्यंत वेळ लागेल.

मा.सभापती :तात्काळ कार्यवाही करावी.

श्री.मोहन मेघावाले :प्रत्येक भागात शौचालय बांधण्याचा सर्वे केला पुर्ण भागात सर्वे केला का ?कुठे आवश्यक आहे की नाही खात्री करून घेतली आहे.हे काम महापालिकेचे अधिकारी करतात की पीएमसी काम करते.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :केंद्र शासनाच्या धरतीवर राज्य शासनाने ही योजना अमलात आणली. ज्यांना शौचालय नाही उघडयावर जात आहे, अशांसाठी ही स्कीम आहे 12 हजार अनुदान मिळणार पहिल्या टप्पयात 6 हजार हे मा.पंतप्रधान जनधन खात्यामध्ये महापालिकेतर्फे जमा होणार ज्यांना पैसे मिळाले असेल त्यांनी सात दिवसाच्या आत काम सुरू केले पाहिजे 85 लोकांने पैसे देऊ शकलो सर्वे वार्ड अधिकारी यांनी केला वार्ड अभियंता फार्म देत आहे.शाखा अभियंता मार्फत लाभार्थीच्या घरी जाऊन पाहणी करतात. जागा पाहिजे.पाणी ड्रेनेज लाईन उपलब्ध आहे का त्यानुसार कमेटी ठरविते तातडीचे काम असल्याने लोकल एजन्सी व प्रत्येक लाभाथीसाठी 50 रू प्रमाणे काम करते.12 हजारात लाभार्थी काम करणार त्यावर मनपाचे नियंत्रण असणार आहे.

श्री.नितीन चित्ते :स्मार्ट सिटी प्रक्रिया कुठपर्यंत आली शासनाकडे सादर केंव्हा करणार.

कार्य.अभियंता(इ फ ) :99 टक्के काम पुर्ण झाले. सबमीशन ऑनलाईन आहे.

श्रीमती कमल नरोटे :माझ्या वार्डात ए वन हॉटेल ते मारोती मंदीर पर्यंत रस्त्याचे कामाची वर्क ऑर्डर दिली दोन वर्ष झाले काम सुरू केले नाही. संचिका मा.आयुक्ताकडे आहे या रस्त्यावर अपघात होत आहे.

कार्य.अभियंता इ व फ :ए-1 व्हा.टॅपींगचे काम आहे. दुसऱ्या ठेकेदाराकडून काम करून घेण्याचा प्रयत्न आहे. 15 दिवस आणखी लागणार आहे

मा.सभापती :तातडीने काम करून घ्यावे.

श्री.रावसाहेब आमले :पडेगाव येथील अतिक्रमण काढले परंतु पुन्हा अतिक्रमण होत आहे त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

प्रशासकीय अधिकारी :संबधीत जमीन मालकाच्या नावाने गुन्हे दाखल करण्याच्या सुचना दिल्या. अज्ञात इसमाच्या नावाने गुन्हे दाखल करता येतात प्लॉटींग दुसऱ्याच्या नावावर आहे जीपीए आहे.

मा.सभापती :जीपीए धारकाच्या मार्फत प्लॉट विकले जातात जमिन मालक व जीपीए धारकावर गुन्हे दाखल करावे. प्लॉट संदर्भात छोटया जाहिरात येतात त्यांच्यावरही कार्यवाही करावी.

श्रीमती ज्योती मोरे :माझ्या वार्डात 7-8 वर्षापासून गुंठेवारी भरली तरीही लाईनद्वारे पाणी सोडले जात नाही.

मा.सभापती :कार्य.अभियंता पापू यांनी तातडीने पाणीपुरवठा या लाईनद्वारे चालू करावा.

श्रीमती समीना शेख :उपअभियंता श्री.बनकर यांनी सन 2014-15 या कार्यकाळात केलेली कामाची माहिती पत्र देऊन मागितली कार्य.अभियंता विदयुत माहिती देत नाही. 23-11-15 ला मा.आयुक्तांना पुन्हा पत्र दिले.

मा.सभापती :संबधीत अधिकारी येथे नाही.आजचे आयुक्त म्हणून उपआयुक्त प्र.यांनी माहिती घेऊन कार्यवाही करावी.

उपआयुक्त प्र. :चौकशी कुणी केली माहिती घ्यावी लागेल.माझ्याकडे दिले होते या संदर्भात आस्थापना विभाग व कार्य.अभियंता श्री.कोल्हे यांचेकडे चौकशी केली असता श्री.बनकर यांचे बाबतीत कोणतीही चौकशी केली नाही. असे म्हटले मागिल बैठकीत श्री.कोल्हे यांनी कार्यवाही करावी असे आदेशीत केले होते.

मा.सभापती :आठ दिवसात कार्यवाही करावी अहवाल सादर करावा.

श्री.गजानन बारवाल :बजेट मंजूर केलेले आहे तातडीने अंदाजपत्रक तयार करून काम करण्याचे आदेशीत करावे.

श्रीमती ज्योती पिजंरकर:आंबेडकरनगर ते पोलीस चौकी पर्यतचा रस्ता सन 2012-13 मध्ये मंजूर झाला अदयाप काम होत नाही.

मा.सभापती :यारस्त्याचे काम मार्गी लावावे तसेच बजेटनुसार अंदाजपत्रक तयार करावे विकास कामे तातडीने सुरू होतील असे नियोजन करावे.

शहर अभियंता :सर्वसाधारण सभेने अंदाजपत्रक मंजूर केले त्यानुसार कामे हाती घेऊ स सदस्या श्रीमती पिंजरकर यांनी सुचीत केलल्या त्या रस्त्याचे कामही 8-10 दिवसात सुरू होईल डीपीडीसीची रक्कम मिळाली आहे.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद